भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड आयुक्तालय
पत्ता:- पुणे नाशिक हायवे, सी. आय. आर. टी. जवळ, एमआयडीसी भोसरी,
पुणे.२६ फोन नं. ०२०- २७१२४७२८
ई--मेल आयडी psbhosari.pcpc-mh@gov.in

## ४८ तासाच्या आत गंभीर गुन्हयाचा तपास करुन दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करुन आरोपीस सक्त मजुरीची शिक्षा

---

भोसरी पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड गुन्हा रजी. क्रमांक १४८/२०२२ भादवि कलम- ३५४, ३५४(अ),५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल होताच.सदर गुन्हयातील पिडीत महीलेस न्याय मिळावा या करिता दाखल गुन्हयात वरिष्ठांनी केलेले मागदर्शन व सुचनांप्रमाणे तपास अधिकारी गोविंद पवार, पोलीस उपनिरीक्षक, भोसरी पोलीस ठाणे यांनी आरोपी नामे- संजय दादाभाऊ माने वय-४२ वर्ष रा. मयुर मेडिकलचे मागे, चक्रपाणी वसाहत भोसरी पुणे यास नमुद गुन्हयात अटक करुन,गुन्हयातील प्रत्यक्षदर्शी साक्षिदार यांचे कडे तपास करुन आरोपी विरुद्ध दोषसिध्दी होईल असा सबळ पुरावा प्राप्त करुन गुन्हा दाखल झाले पासुन सदर गुन्हयाचा ४८ तासात तपास पुर्ण करुन आरोपीस दोषारोपपत्रासह मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, पिंपरी पुणे यांचे कोर्टात समक्ष हजर केले. मा. न्यायालयाने तपास अधिकारी यांनी केलेल्या कामाची तात्काळ दखल घेवुन गुन्हयाचे गांभीर्य पाहुन सदरची केस फास्ट ट्रॅकवर चालवुन आरोपीस दि. १८.१०.२०२२ रोजी ३ वर्ष ६ महिने सक्त मजुरी व १५००/- रुपये दंड अशी शिक्षा ठोठावलेली आहे. आरोपीस शिक्षा लागल्याने पिडित महिलेस न्याय मिळालेला आहे.

सदर कामगिरी मा.अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड, मा.डॉ.संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त,.मा.मंचक इप्पर सो,पोलीस उप-आयुक्त, मा.डॉ.सागर कवडे, सहायक पोलीस आयुक्त, भास्कर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भोसरी पो.ठाणे, अरविंद पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, गोविंद पवार, पोहवा देढे, डामसे, पाटील,करे,डगळे पोलीस शिपाई सागर जाधव, स्वामी नरवडे, महिला पोलीस शिपाई मुळुक यांनी सदर उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

(मंचक इप्पर)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner